मध्यस्थ दर्शन ( सहअस्तित्ववाद ) आधारित

# जीवन विद्या

## अध्ययन बिंदु

प्रणेता आणि लेखक -
ए. नागराज
मध्यस्थ दर्शन (सहअस्तित्ववाद)

सहयोग राशि - रू. २० /-

# जीवन विद्या - अध्ययन बिंदु

जीवन ज्ञान संबंधी अध्ययन अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतन विधि से प्राप्त हुआ। ऐसी प्राप्ति ए. नागराज, अमरकंटक, भजनाश्रम निवासी को प्राप्त हुआ।

मैं, नागराज, बता रहा हूँ कि साधना समाधि संयमपूर्वक अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन मुझे समझ में आया। मैं इस आधार पर साधना किया। ब्रह्म से जगत पैदा हुआ, ब्रह्म सत्य जगत मिथ्या कहा जाता है शास्त्रों में। इस जिज्ञासावश मैं साधना किया। संयमपूर्वक जब संपूर्ण अस्तित्व को अध्ययन किया अध्ययन विधि से, तब ये पता चला ब्रह्म से कोई चीज पैदा नहीं हुआ है। ब्रह्म में संपूर्ण प्रकृति काम कर रहा है। विगत से, दोनों विधा से , आदर्शवादी, भौतिक विधा से, किये गये अध्ययन में छूटे हुए मुद्दे तीन बिंदुओं में मुझे समझ में आए, सह-अस्तित्वरूपी अस्तित्व दर्शन ज्ञान, जीवन ज्ञान, मानवीयतापूर्ण आचरण ज्ञान। मानवीयतापूर्ण आचरण ज्ञान संबंधी बात पर सभी समुदाय कुछ कुछ सोचा। यह किसी समुदाय से आचरण सर्वमानव को स्वीकार नहीं, यह आंकलन बीसवी शताब्दि के अंत तक हुआ। इक्कीसवी शताब्दि के प्रथम दशक में अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन मानव गोचर होने लगा । कुछ ज्ञानी, विज्ञानी, अज्ञानियों में स्वीकृत होने लगा। इससे मेरा मन यह स्वीकार किया यह सर्वमानव उपयुक्त है। इसी आधार पर सर्वमानव सम्मुख प्रस्तुत करने का प्रयत्न किया। आशा है इससे सर्वमानव उपकृत हो।

योग संयोगवश आयुष्मान योगेश एवं आयुष्मति सुवर्णा इस अध्ययन के संपर्क में आए। आपकी इच्छा हुई , इसमें से ‘‘ जीवन विद्या - अध्ययन बिंदु ’’ शीर्षक से जो प्रस्तुत हुआ, मराठी भाषा में प्रस्तुत करने की इच्छा प्रकट किये। यद्यपि यह मूलतः पूरा हिंदी

भाषा में लिखा हुआ है। दस - बारा पुस्तिकाओं में पूरी बात प्रस्तुत हुई है। उसमें से अभी जो ‘‘जीवन विद्या - अध्ययन बिंदु ’’ को प्रस्तुत किये है, मराठी भाषाविद् विद्वान लाभान्वित होंगे ऐसा मेरा विश्वास है।

भाषा संबंधी परिपूर्णता की जिम्मेदारी और इसे शुद्ध रूप में प्रस्तुत करने की जिम्मेदारी योगेश, सुवर्णा दंपति के साथ समाहित है।

इसमें उन्हें दिवटे परिवार पुणें, शास्त्री परिवार पुणें, पुराणिक परिवार रायपुर इनसे सहयोग प्राप्त हुआ है। विश्वास करता हूँ उन्नत मराठी भाषा इससे गौरवान्वित होगा।

ए. नागराज
श्री भजनाश्रम, श्री नर्मदांचल, अमरकंटक
जिला - अनूपपुर, म.प्र. भारत

# प्रस्तावना

अस्तित्वमूलक मानवकेंद्रित चिंतन म्हणजेच मध्यस्थ दर्शनावर (सहअस्तित्ववादावर) आधारित जीवन विद्या प्रबोधन कार्यासाठी बिंदुनिश्चिती करताना मला प्रसन्नतेचा अनुभव होतो आहे. ह्या प्रयत्नामध्ये हीच अपेक्षा आहे की जीवन विद्या प्रबोधक, संकेत केलेल्या सगळया बिंदुवर लक्ष ठेवतील आणि (त्यांना) सुस्पष्ट करतील.

मी आपल्यामध्येच हे तथ्य अनुभवलेले आहे की प्रत्येक मानवाने ज्ञान, विज्ञान, विवेक संपन्न होणे आवश्यक आहे, आपल्या – परक्यामधील काल्पनिक भिंतींना हटवण्यासाठी हाच सार्थक व सक्षम स्रोत आहे.

जीव चेतनेतून मानव चेतनेमध्ये गुणात्मक परिवर्तन अति आवश्यक झाले आहे, कारण धरती आजारी झाली आहे, प्रत्येक समुदाय असुरक्षिततेच्या चक्रामध्ये अडकत चालला आहे . ह्या अनिष्ट, सर्वनाश करणाऱ्या परिस्थितीचे कारण मानवामध्ये समाहित असलेली अमानवीयताच आहे . अमानवीयता हेच जीव चेतनेचे स्वरूप आहे. ह्यातून मुक्ती मिळविण्यासाठी म्हणजेच मानव चेतना संपन्न होण्यासाठी अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतन, मध्यस्थ दर्शन (सह – अस्तित्ववाद ) हाच संकेत होण्याच्या अर्थाने जीवन विद्या कार्यक्रम आहे. ह्याला अध्ययनासाठी प्रस्तुत करताना स्वतःच्या सार्थकतेचा अनुभव करतो.

**'' भूमी स्वर्ग व्हावी, मनुष्य देव व्हावा।**
**मानव धर्म सफल व्हावा, नित्य शुभ व्हावे।''**

प्रणेता आणि लेखक
**ए. नागराज**
मध्यस्थ दर्शन (सह– अस्तित्ववाद)
भजनाश्रम, नर्मदांचल
अमरकंटक (मध्य प्रदेश)

# जीवन विद्या -अध्ययन बिंदु

**उद्देश** -

- जीव चेतनेतून मानव चेतनेमध्ये गुणात्मक परिवर्तनाकरिता –

- मानवीयता सहज ( स्वाभाविक ) आचरण प्रमाणासाठी–

- सर्वतोमुखी समाधान – समृद्धी सहित – अखंड समाज आणि सार्वभौम व्यवस्था रूपात प्रमाणासाठी –

| *** वर्तमान स्थिती *** | *** आवश्यकता *** |
|---|---|
| धरती तापग्रस्त | धरती संतुलित राहणे. |
| प्रदूषण | ऋतू सतत संतुलित राहणे. |
| सर्व मानव समुदाय असुरक्षित | धरतीवर मानव अक्षुण्ण (निरंतर) राहणे. |

# -संपृक्तता-

—व्यापक वस्तुरूपी सत्तेमध्ये संपूर्ण एक एक वस्तू संपृक्त—

भिजलेली (भीगी) बुडालेली (डूबी) घेरली गेलेली(घिरी)

ऊर्जासंपन्नता
बलसंपन्नता
चुंबकीय बलसंपन्नता
सम विषम मध्यस्थ
स्वत्व
स्व = असणे
त्व = व्यवस्था सूत्र
पूरकता – उपयोगिता
रूपामध्ये

क्रियाशीलता

आचरण
त्व सहित व्यवस्था
समग्र व्यवस्थेमध्ये
भागीदारी

नियंत्रण
नियम
संतुलन
नियती
नित्य वर्तमान

श्रम
लक्ष्य (विश्राम)
समाधान
अभ्युदय
मानवत्व
देवमानवत्व

गती
(गन्तव्य)
आचरणपूर्णता
दिव्यपद
दिव्यमानवत्व

परिणाम
(अमरत्व)
जीवन
(चैतन्य एकक)

## अस्तित्व दर्शन

1. **मूळ बिंदू** – सहअस्तित्वाचे ( सत्तेमध्ये संपृक्त जड – चैतन्य प्रकृती) अध्ययन.

## 2. जागृत जीवनामध्ये दहा क्रिया

| | जीवन बल | क्रिया | क्रिया | जीवन शक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | आत्मा | अनुभव | प्रमाणिकता | प्रमाण |
| २. | बुद्धि | बोध | संकल्प | ऋतंभरा |
| ३. | चित्त | चिंतन | चित्रण | इच्छा |
| ४. | वृत्ति | तुलन | विश्लेषण | विचार |
| ५. | मन | आस्वादन | चयन(निवड) | आशा |
| | | मूल्यांचे | संबंधांची | |
| | | | ओळख | |




## 3. प्रकृतीमध्ये संपन्नता -

पदार्थावस्था : ऊर्जासंपन्नता, क्रियाशीलता

प्राणावस्था : ऊर्जासंपन्नता, क्रियाशीलता, स्पंदनशीलता

जीवावस्था : ऊर्जासंपन्नता, क्रियाशीलता, स्पंदनशीलता, आशासंपन्नता

ज्ञानावस्था : ऊर्जासंपन्नता, क्रियाशीलता, स्पंदनशीलता, आशासंपन्नता , ज्ञानसंपन्नता

## 4. अस्तित्वामध्ये चार अवस्था

पदार्थावस्था
प्राणावस्था
— जड प्रकृती – क्रियाशील
स्पंदनशील

जीवावस्था
ज्ञानावस्था
— चैतन्य प्रकृती – चेतना संपन्न
(जगण्याच्या
आशेच्या रूपामध्ये)
जीव चेतना
मानव चेतना

5. **पदार्थावस्थेमध्ये श्रम, गती व परिणाम**
प्राणावस्थेमध्ये स्पंदनासहित श्रम, गती, परिणाम–

6. परिणामक्रमामध्ये अनेक यथास्थिती, उपयोगिता, पूरकतेसहित, आपल्या 'त्व'सहित व्यवस्था व समग्र व्यवस्थेमध्ये भागीदार.

7. घन, वायू रूपातील परमाणु (अणू), अणुंच्या (रेणूंच्या) जातींनी कोणतीही धरती समृद्ध संपन्न झाल्यानंतर, स्वयंस्फूर्त विधिने यौगिक (संयुग) क्रियांमध्ये प्रवृत्ती, त्यामुळेच रसायन संसार (क्षार (अल्कली), आम्ल, रचना तत्व, पुष्टी तत्व) बनणे.
त्याचे कारण – नित्य प्रभावी सहअस्तित्व, प्रकटनशील

8. ह्या चार प्रकारच्या पदार्थ तत्वांनी संपन्न झाल्यानंतर धरतीवर प्राणावस्था उद्‌भवणे.; ही अवस्था बीज – वृक्ष विधिने आवर्तनशील परंपरा आहे. हेच प्राण पद चक्र आहे.

9. प्राणावस्था तृप्त झाल्यानंतर प्राणावस्थेच्या अवशेषांनी स्वेदज (घामाने उत्पन्न होणारे – उवा, ढेकूण, डास इ.) संसाराची निष्पत्ती (प्रकटन ) – अंडज – पिंडज स्वाभाविक (सहज) प्रकटन.

10. परमाणुमध्ये (अणूमध्ये) विकास = गठनपूर्ण परमाणु (घडणपूर्ण अणू) = जीवन पदामध्ये (चैतन्य)

11. स्वेदज संसारातून अंडज संसार प्रकट होणे.

12. अंडज संसारामध्ये गुणात्मक परिवर्तन विधिने अनेक जातींचे प्रकटन होणे. (हे सुद्धा उपयोगिता विधी –पूरकता विधिने सहअस्तित्वाला प्रमाणित करताना स्पष्ट (झाले).

13. गुणात्मक परिवर्तन विधिने अंडज संसाराने पिंडज संसाराला संबद्ध केले जाणे.

14. अंडज संसारातून भूचर, नभचर, जलचर (हे) तीन प्रकार झाले. तिन्हींमध्ये प्रकट झाले तरी पिंडज संसारामध्ये भूचर सर्वाधिक आहेत. प्रत्येक परंपरेचे सहअस्तित्व विधिने (पूरकता – उपयोगिता विधी) प्रकट होणे.

15. श्रेष्ठतेकडे गुणात्मक परिवर्तनामुळे पिंडज संसारामध्ये रचनांच्या अनेक परंपरा स्थापित झाल्या. त्यापैकी एक परंपरा आहे – मानव शरीर.

16. शरीर आणि जीवनाच्या संयुक्त रूपामध्ये मानव आहे. शरीराबरोबर एकमेकांना ओळखण्याच्या क्रमामध्ये वंश, रंगाच्या आधारावर अनेक जाती मानल्या आहेत. खरे तर मानव शरीर एकाच जातीचे असते– मानव जात एक आहे.

(विसाव्या शतकानंतरच हे तथ्य ओळखण्यास माणूस योग्य झाला. ह्याचे प्रमाण अस्तित्व मूलक मानव केंद्रित चिंतन ज्ञान, मध्यस्थ दर्शन, सहअस्तित्ववाद विधिने स्पष्ट झाले.)

17. **अस्तित्वमूलक मानवकेंद्रित चिंतन ज्ञान म्हणजेच स्वतःमध्ये सहअस्तित्वरूपी**

1. अस्तित्वदर्शन ज्ञान
2. जीवन ज्ञान
3. मानवीयतापूर्ण आचरण ज्ञानाचा मानवाला बोध होणे आहे.

**18. अशा ज्ञानाचे लोकव्यापीकरण करण्याच्या क्रमामध्ये जीवन विद्या कार्यक्रम आहे.**

- मानवीय शिक्षा– संस्कार पूर्वक
- लोक शिक्षेच्या रूपामध्ये जीवन विद्येचा कार्यक्रम
- परिवार मूलक स्वराज्य व्यवस्था सहज (स्वाभाविक) प्रमाण

19. **जीवन विद्येमध्ये सर्वप्रथम '' जीवन हाच द्रष्टापदामध्ये आहे'' असण्याचे - राहण्याचे अध्ययन.**

20. **द्रष्टापद असल्यामुळे 'जागृती' सहज (स्वाभाविक) प्रमाण असण्याचे अध्ययन .**

- विसाव्या शतकापर्यंत मानव परंपरा अनेक समुदायांमध्ये ओळखण्याची समीक्षा
- व्यक्तिवाद, समुदायवाद निर्मित झाला हे सगळयांना माहिती आहे.
- समीक्षेच्या परिणाम रूपात '' समुदाय समाज नाही, समाज समुदाय नाही '' ह्याचा बोध होणे.

21. **मानव आपल्या मानवत्वासहित व्यवस्था, समग्र व्यवस्थेमध्ये**

**भागीदार असणे.**

22. **अखंड समाजाचे स्वरूप**
व्यवहार सूत्र – व्याख्या विधिने स्पष्ट होणे.

23. **सार्वभौम व्यवस्थेचे दहा सोपानीय (स्तरीय) विधिने अध्ययन होणे.**

24. **मानव - व्यक्ती रूपामध्ये -**
समाधान संपन्नता
जागृती संपन्नता

25. **परिवार रूपामध्ये** –
वैभव = समाधान संपन्नता, समृद्धी संपन्नता

26. **अखंड समाजाच्या रूपामध्ये** –
- समाधान, समृद्धी, अभय, सहअस्तित्व
- मानव जात एक धर्म एक
- सर्वतोमुखी समाधान धर्मामध्ये जगण्याचा बोध

हे अखंड समाजाचे सूत्र आहे.
मानव धर्म = सुख = समाधान = सुख
समस्या = दुःख

27. **जन प्रतिनिधी विधिने - परिवार सभांमध्ये व्यवस्था सहज (स्वाभाविक) कार्यक्रमांमध्ये भागीदारी करण्याचा बोध.**

28. **व्यवस्था सहज (स्वाभाविक) पाच आयामांचा स्पष्ट बोध आणि हृदयंगम (होणे).**
१. शिक्षा – संस्कार व्यवस्था
२. न्याय – सुरक्षा व्यवस्था
३. उत्पादन – कार्य व्यवस्था

४. विनिमय – कोष व्यवस्था
५. स्वास्थ्य – संयम व्यवस्था

29. **मानव संबंध, नैसर्गिक संबंधांचा बोध करवण्याचा कार्यक्रम**
मुख्यतः मानव संबंध –सात
नैसर्गिक संबंध – तीन

| **मानव संबंध** | **नैसर्गिक संबंध** |
|---|---|
| १. माता–पिता आणि पुत्र–पुत्री | १. जीवावस्थेबरोबर |
| २. भाऊ – बहीण | २. प्राणावस्थेबरोबर |
| ३. गुरू – शिष्य | ३.पदार्थावस्थेबरोबर |
| ४. साथी – सहयोगी | |
| ५. मित्र – मित्र | |
| ६. पति – पत्नी | |
| ७. व्यवस्था आणि समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी | |

30. **संबंधांमध्ये समाहित आशय मूल्यांचा निर्वाह**

| **सात संबंध** | **क्रिया** |
|---|---|
| माता – पिता | पोषण – संरक्षण |
| भाऊ – बहीण | परस्पर अभ्युदय संयोग (सहयोग) |
| मित्र – मित्र | परस्पर पूरक |
| गुरू – शिष्य | प्रामाणिक – जिज्ञासू |
| साथी – सहयोगी | दायित्व - कर्तव्य |
| पुत्र – पुत्री | अभ्युदय, उपयोगिता, पूरकता |
| पति–पत्नी | यतीत्व – सतीत्व |

31. **नैसर्गिक संबंधांमध्ये नियम,नियंत्रण,संतुलनाचा बोध**.

32. **मानव संबंधांमध्ये नियम, नियंत्रण,संतुलन,न्याय,धर्म, सत्य सहज (स्वाभाविक) बोधासहित -**

| | | |
|---|---|---|
| जीवन मूल्य | – | चार |
| मानव मूल्य | – | सहा |
| स्थापित मूल्य | – | नऊ |
| शिष्ट मूल्य | – | नऊ |
| वस्तू (उत्पादित) मूल्य | – | दोन |

ह्यांचे पूर्ण अध्ययन आणि बोध.

33. **जीवन मूल्य**

समाधान = सुख

समाधान समृद्धी = शांती

समाधान समृद्धी अभय = संतोष

समाधान समृद्धी अभय सहअस्तित्व सहज (स्वाभाविक) प्रमाण = आनंद

| | | |
|---|---|---|
| **समाधान** | **=** | **का, कसे ह्याचे उत्तर** |
| समृद्धी | = | परिवार स्वाभाविक आवश्यकतेपेक्षा अधिक प्राकृतिक नियमानुसार स्वाभाविक उत्पादन |
| अभय | = | परस्पर न्याय सुलभता |
| सह –अस्तित्व | = | चारही अवस्थांमध्ये संतुलन |
| | = | नियम, नियंत्रण, संतुलन, न्याय, धर्म,सत्यपूर्वक जगणे. |

34. **मानवीय चेतना संपन्न मानव संबंधांमध्ये स्थापित व शिष्ट मूल्य खालीलप्रमाणे आहेत-**

| **स्थापित मूल्य** | **शिष्ट मूल्य** |
|---|---|
| १. कृतज्ञता– प्राप्त सहाय्य, उपकाराविषयी स्वीकृती, प्रसन्नता व निरंतरतेची स्वीकृती. | १. सौम्यता– स्वयंस्फूर्त प्रणाली, पद्धतीने स्वतःचे नियंत्रण. |

२. गौरव – विकसिताची (जागृत) ओळख आणि त्याच्या अनुरूप होण्यामध्ये उत्साह आणि निरंतरता.

२. सरलता –ग्रंथी (तणाव) रहित अंगहार (हावभाव ) व त्याचे प्रकाशन.

३. श्रद्धा– प्रामाणिकता, श्रेष्ठतेकडे प्रवृत्ती आणि संकल्पासहित गती.

३. पूज्यता – गुणात्मक परिवर्तनासाठी सक्रियता.

४. प्रेम– पूर्णता सहज (स्वाभाविक) प्रमाण ; दया, कृपा, करूणा ह्यांची संयुक्त अभिव्यक्ती. पूर्णतेमध्ये नित्य रति, पूर्णतेची सहज (स्वाभाविक) निरंतरता.

४. अनन्यता- जागृतीपूर्णते – साठी योग्य ओळख, प्रमाण सहज (स्वाभाविक) निरंतरता.

५. विश्वास – संबंध निर्वाहाच्या निरंतरतेसहित मूल्यांच्या निर्वाहाची निरंतरता.

५. सौजन्यता–सहकारिता, सहयोगिता , पूरकता, उपयोगिता.

६. वात्सल्य – अभ्युदय, सर्वतोमुखी समाधानाच्या अर्थाने पोषण, संरक्षण.

,

६. सहजता– यथास्थिती स्वाभाविक स्वतःमध्ये विश्वास, श्रेष्ठतेचा सन्मान, प्रतिभा आणि व्यक्तित्वामध्ये संतुलन, व्यवहारामध्ये सामाजिक, उत्पादनामध्ये स्वावलंबन प्रमाणाची निरंतरता.

७. ममता – स्वतःमध्ये , स्वतःपासून , स्वतःसाठी प्रतिरूपता स्वाभाविक स्वीकृती, उत्सवाची निरंतरता.

७. उदारता– प्रतिफलाच्या अपेक्षेविना कर्तव्य, दायित्व वहन करणे, तन,मन,धन अर्पण.

८. सम्मान (सन्मान) – व्यक्तित्व आणि प्रतिभेमध्ये श्रेष्ठता स्वाभाविक प्रमाणाची ओळख , स्वीकृती– प्रमाणित होण्याची प्रवृत्ती.

८. सौहार्द्रता – स्पष्टतेने मूल्यांकन, क्रियांमध्ये स्पष्टता आणि सार्थकता.

९. स्नेह – संतुष्टी, प्रसन्नता, उत्सवामध्ये, उत्सवापासून, उत्सवासाठी स्वयंस्फूर्त मिलन सान्निध्याची निरंतरता.

९. निष्ठा – मानवीयतापूर्ण विचार व्यवहारामध्ये निरंतरता, मानवीयतेसहित व्यवस्था स्वाभाविक (सहज) वर्तमान.

सगळया संबंधांचा निर्वाह हीच व्यवस्था आहे. अभिव्यक्ती , संप्रेषणा स्वाभाविक प्रकाशन = भाषा भाव मुद्रा अंगहार (हावभाव) प्रक्रियेसहित संप्रेषणा = अचूक भाषा (अर्थसंगत) = चित्र लेख रूपामध्ये = स्वीकृत संप्रेषणा = अभिव्यक्ती = संबंध निर्वाहाचे स्वाभाविक प्रमाण.

किशोरावस्थेपर्यंत संबोधनाची ओळख आणि दहा वर्षानंतर समजेसहित निर्वाह.

परस्परतेमध्ये अपेक्षा – आवश्यकता.

## 35. **संबंध निर्वाह मूल्य**

### १. **माता पित्याबरोबर संततीचा (संतान) संबंध**

विश्वासाचे निर्वहन आणि त्याची निरंतरता ; गौरव, कृतज्ञता, प्रेम, सरलता, सौम्यता, अनन्यता भाव विधिने वस्तू आणि सेवा समर्पणासमवेत तृप्ती – समाधान प्रमाण वर्तमान असणे.

२. **पुत्र - पुत्री (संततीचे ) बरोबर माता - पिता, अभिभावक- विश्वास निर्वाहाची निरंतरता**

ममता, वात्सल्य, प्रेम, उदारता, सहजता, अनन्यता भाव, वस्तू व सेवा समर्पणाच्या रूपामध्ये वर्तमान असणे .

३. **भाऊ - बहीण संबंधामध्ये विश्वास निर्वाहाची निरंतरता**

सम्मान (सन्मान) , गौरव, कृतज्ञता, प्रेम, सौहार्द्रता, सरलता, सौजन्यता, अनन्यता भावपूर्वक वस्तू व सेवा समर्पणाच्या रूपामध्ये आहे.

४. **गुरूची - शिष्याबरोबर विश्वास निर्वाहाची निरंतरता**

प्रेम, वात्सल्य, ममता, अनन्यता, सहजता, उदारता भावपूर्वक वस्तू व सेवा समर्पणाच्या रूपामध्ये वर्तमान.

५. **शिष्याची - गुरूबरोबर विश्वास निर्वाहाची निरंतरता**

गौरव, कृतज्ञता, सम्मान (सन्मान), प्रेम, सरलता, सौजन्यता , सहजता, अनन्यतेच्या भावाने जिज्ञासेसहित वस्तू आणि सेवेच्या अर्पण – समर्पण रूपामध्ये आहे

६. **पति- पत्नीच्या परस्परतेमध्ये विशवास निर्वाहाची निरंतरता**

स्नेह, गौरव, सम्मान (सन्मान), प्रेम, निष्ठा, सरलता, सौहार्द्रता, अनन्यतेच्या भावाने वस्तू सेवा समर्पणाच्या रूपामध्ये (आहे).

७. **साथीची सहयोगीबरोबर विश्वास निर्वाहाची निरंतरता**

स्नेह, ममता, दया स्वाभाविक निष्ठा, उदारता, कर्तव्यासहित दायित्वाने वस्तू व सेवा प्रदान करण्याच्या रूपामध्ये (आहे).

**८. सहयोगीची साथीबरोबर विश्वास निर्वाहाची निरंतरता**

गौरव, सम्मान (सन्मान), कृतज्ञता, सहजता, सरलता, सौहार्द्रता, सौजन्यतेच्या भावासहित सेवा समर्पणाच्या रूपामध्ये आहे.

**९. मित्राची मित्राबरोबर विश्वास निर्वाहाची निरंतरता**

स्नेह, सम्मान (सन्मान), प्रेमपूर्वक निष्ठा, सौहार्द्रता, अनन्यतेच्या भावासहित वस्तू आणि सेवेच्या अर्पण समर्पण रूपामध्ये (आहे).

**१०. परिवार व्यवस्थेमध्ये विश्वास निर्वाहाची निरंतरता**

मानवीयतापूर्ण आचरणासहित संबंधांच्या निर्वाहासमवेत केले गेलेले व्यवहार, कार्य – परिवारामध्ये, परिवारापासून , परिवारासाठी पोषण, संरक्षण, समाजगतीसाठी आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादन संपन्नता, उपयोग– सदुपयोग, प्रयोजनपूर्वक व्यवस्था प्रमाण वर्तमान (असणे) – वैभव आहे.

**36. पंचकोटीचे मानव - तीन वर्गामध्ये**

१. अमानव – पशुमानव, राक्षसमानव

२. मानव – मानवीयतापूर्ण मानव

३. अतिमानव – देवमानव, दिव्यमानव

**37.** सह – अस्तित्व नित्य वर्तमान (आहे), स्थितीपूर्ण सत्तेमध्ये प्रकृती संपृक्त (आहे). स्थितीशील प्रकृती अर्थातच पूर्णतेमध्ये गर्भित प्रकृती (भिजल्यामुळे). व्यापक सत्तेमध्ये जड – चैतन्य प्रकृती नित्य वर्तमान (आहे).

**38. मानव - ज्ञानावस्थेमध्ये असून**

● भ्रांतिपदामध्ये – व्यक्तिवाद , समुदायवाद
● अमानव म्हणजेच भ्रांतिपदामध्ये मानवाचे दोन प्रकार (आहेत) – पशु मानव, राक्षस मानव
● भ्रांतिपदामध्ये भय आणि प्रलोभनवश

१. अधिमूल्यन
२. अवमूल्यन
३. दोषवश निर्मूल्यन

अमानवाचा स्वभाव – जीव चेतनावश हीनता, दीनता, क्रूरता
प्रवृत्ती– चार विषयांमध्ये प्रवृत्ती ( आहार, निद्रा, भय, मैथुन)
दृष्टी – प्रिय, हित, लाभ
कार्यक्रम – सुविधा, संग्रह
पशुमानव = दीनता प्रधान
राक्षस मानव = क्रूरता प्रधान

**39. मानव चेतना संपन्न**

मानव स्वभाव = धीरता, वीरता , उदारता
दृष्टी = न्यायप्रधान, धर्म, सत्य
प्रवृत्ती = मानवीय परिवार – मानवत्वरूपी व्यवस्था आणि समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी

**40. देव पद स्वाभाविक मानव = जागृत मानव**

जागृत मानव स्वभाव = धीरता , वीरता, उदारता, दया, कृपा
दृष्टी = धर्मप्रधान,न्याय, सत्य (सर्वतोमुखी समाधान)
प्रवृत्ती = मानवीय व्यवस्था, अखंड समाज आणि सार्वभौम व्यवस्था

**41. द्रष्टापद प्रतिष्ठा - (दिव्य मानव)**

जागृतीपूर्ण मानव स्वभाव = धीरता, वीरता, उदारता, दया, कृपा, करूणा

दृष्टी = सत्य प्रधान समाधान न्याय
प्रवृत्ती = सर्वशुभ
सहअस्तित्वरूपी अस्तित्वामध्ये अखंडता सूत्र व्याख्या सार्वभौमता स्वाभाविक वर्तमानामध्ये प्रमाण.

42. **द्रष्टा पद प्रतिष्ठा स्वाभाविक जागृती प्रमाण संपन्नता**

मानव हाच द्रष्टा, कर्ता, भोक्ता (आहे) – जागृतीपूर्वक कार्य व्यवहार करायला स्वतंत्र, फल भोगायला स्वतंत्र (आहे).
जागृतीपूर्वक केलेले संपूर्ण कर्मफल नियती विधी स्वाभाविक असण्याच्या आधारावर फल भोगायला स्वतंत्र (आहे).
नियती विधी म्हणजेच – पूरकता, उपयोगिता स्वाभाविक प्रमाण.
सकारात्मक फलाचे वाटप स्वीकार्य होते, नकारात्मक फल कोणी स्वीकार करत नाही.

**43.** अखंड धरती अखंड राष्ट्र
अखंड मानव समाज राज्य– दहा सोपानीय राज्य
अखंडता आणि सार्वभौमतेच्या अर्थाने राज्ये सार्थक
पूरकता उपयोगिता विधिने धरतीवर वैभवित (असलेल्या) चारही अवस्थांमध्ये संतुलन (आहे).

44. (1) **अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतनपूर्वक सह - अस्तित्ववादी विधिने** -

– परिवार व्यवस्थेमध्ये विश्वास निर्वाहाची निरंतरता
समजदार–ज्ञान विवेक विज्ञानाने संपन्न परिवारातील लोक परिवारामध्ये – मानवीयतापूर्ण आचरणासहित समाधान समृद्धी स्वाभाविक प्रमाणामध्ये स्वत्व, स्वतंत्रता,अधिकार संपन्नता व वैभव निरंतरतेसाठी अनुकूल परिस्थिती वर्तमानामध्ये विश्वास (अभय) सूत्र

**- वर्तमानामध्ये उपयोगिता पूरकतेनुसार स्वाभाविक अनुकूल परिस्थिती -**

(१) मानवीय शिक्षा – संस्कार सुलभता –
(२) न्याय सुरक्षा सुलभता –
(३) उत्पादन कार्य सुलभता –
(४) विनिमय कोष सुलभता –
(५) स्वास्थ्य संयम सुलभता – स्वाभाविक ज्ञान विज्ञान विवेक सुलभता हेच अखंडता सार्वभौमता स्वाभाविक सूत्र, दहा स्तरीय व्यवस्था व्यक्त होणे हीच व्याख्या.
प्रत्येक जागृत मानवाच्या जगण्यामध्ये जीवन मूल्याच्या अर्थाने मानव लक्ष्य प्रधान आहे.

अखंड समाज – सूत्र व्याख्यारूपी व्यवहारामध्ये – स्थापित मूल्य, शिष्ट मूल्य प्रधान – वैभव– सार्वभौम व्यवस्था सूत्र व्याख्या रूपी भागीदारीमध्ये (आहे).

मानव मूल्य प्रधान – प्रमाण वर्तमान – वैभव आहे.

प्रत्येक समजदार मानवाने जीवन मूल्यांच्या अर्थाने मानव लक्ष्य प्रमाणित करणे हेच प्रमाण, वर्तमानामध्ये विश्वास परंपरा आहे. प्रत्येक परिवार मानव मुख्यतः स्थापित मूल्य, शिष्ट मूल्यासहित अखंड राष्ट्र, समाजाच्या वैभवाच्या अर्थाने प्रमाण परंपरा वैभव आहे.

**जागृत मानव परंपरेमध्ये -**

जगण्याच्या वैभवामध्ये – जीवन मूल्यांच्या अर्थाने मानव लक्ष्य प्रधान (आहे).

अखंड समाज वैभवामध्ये – स्थापित व शिष्ट मूल्य प्रधान

(आहे).

सार्वभौम व्यवस्था स्वाभाविक वैभवामध्ये मानव मूल्य प्रधान आहे.

**(44-2-1) अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतन पूर्वक सहअस्तित्ववादी विधिने -**

**(१) परिवार सभा - व्यवस्थेच्या अर्थाने**

(२) परिवार समूह सभा

= दहा परिवार सभांमधून निवडलेली

= दहा लोक प्रतिनिधी परिवार समूह सभा मानवीयतापूर्ण आचरणाने संपन्न (असलेली)

= परिवार अखंड समाज सूत्र व्याख्या

**परिवार सभा, सार्वभौम व्यवस्था सूत्र व्याख्येनुसार पंचमुखी कार्यक्रम प्रवृत्ती जसे-**

(१) मानवीय शिक्षा – संस्कार कार्य

(२) मानवीय न्याय – सुरक्षा कार्य

(३) मानवीय उत्पादन – कार्य

(४) मानवीय विनिमय – कार्य

(५) मानवीय स्वास्थ्य – संयम कार्य

प्रवृत्तींचे परीक्षण, निरीक्षण, समृद्धीकरण, आकलन कर्तव्य संयुक्त सत्यापन

**(44-2-2) अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतनपूर्वक सहअस्तित्ववादी व्यवस्था विधिने -**

प्रत्येक परिवार मानवामध्ये सहा प्रकारच्या महिमा (असतील ), जसे–

(१) स्वतःमध्ये विश्वास

(२) श्रेष्ठतेचा सन्मान करण्यामध्ये विश्वास

(३) स्वप्रतिभेमध्ये विश्वास

(४) प्रतिभेनुसार व्यक्तित्वामध्ये विश्वास
(५) व्यवहारामध्ये सामाजिक
(६) व्यवसायामध्ये स्वावलंबन

स्वाभाविक प्रवृत्ती प्रमाणातून निरीक्षण, परीक्षण, आकलन, आवश्यकतेनुसार समृद्धीकरण संयुक्त सत्यापन

**(44-2-3)अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतनपूर्वक सहअस्तित्ववादी व्यवस्था विधिने गल्ली, गाव,परिवार सभा-**

दहा परिवार समूह सभांमधून निवडलेले प्रतिनिधी
परिवार सभेमधून निवडलेले दहा जनप्रतिनिधी, मनोनीत ( निवडलेल्या ) पाच समित्या,

जसे–
(१) मानवीय शिक्षा – संस्कार समिती
(२) मानवीय न्याय – सुरक्षा समिती
(३) मानवीय उत्पादन – कार्य समिती
(४) मानवीय विनिमय – कोष समिती
(५) मानवीय स्वास्थ्य – संयम समिती

गल्ली, गाव परिवार सभा स्वाभाविक प्रयोजनांच्या अर्थाने – दहा परिवार समुहांच्या स्वाभाविक आवश्यकतेनुसार समितीमध्ये कार्यरत व्यक्तिचे दायित्व निश्चित केले जाईल.

**(44-2-4)अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतनपूर्वक सहअस्तित्ववादी व्यवस्था विधिने**

गल्ली, ग्राम परिवार सभा

दहा परिवार समूहांच्या सभेमधून प्रत्येक सभेच्या सदस्यांचे संयुक्त सत्यापन

प्रत्येक समितीच्या सदस्यांचे संयुक्त सत्यापन आणि ग्राम गल्ली समितीच्या स्वतःच्या आवश्यकतेनुसार परीक्षण निरीक्षणाने–

शंभर परिवारांमध्ये – समजदारी संपन्नता स्वाभाविक यथास्थिती, समजदारी हीच ज्ञान सहज रूपामध्ये, इमानदारी स्वाभाविक यथास्थितीचे विवेक व विज्ञान स्वाभाविक रूपामध्ये, जिम्मेदारी (जबाबदारी)स्वाभाविक यथास्थितीमध्ये मानव संबंधांची ओळख

नैसर्गिक संबंधांची ओळख, स्वाभाविक रूपामध्ये भागीदारी स्वाभाविक यथास्थितीची मानवत्वासहित व्यवस्था, समग्र व्यवस्थेमध्ये भागीदारी, उपयोगिता, पूरकता स्वाभाविक रूपामध्ये

**(44-2-5) अस्तित्वमूलक मानव केंद्रित चिंतनपूर्वक सहअस्तित्ववादी विधिने-**

ग्राम गल्ली परिवार सभा–

लोक शक्ती चेतना महिमा प्रवृत्ती व निष्ठा स्वाभाविक वैभवाचे निरीक्षण परीक्षणपूर्वक सत्यापन

लोक शक्तीचे समजदारीच्या रूपामध्ये–

मानव चेतना स्वाभाविक समजदारी इमानदारी स्वाभाविक संयुक्त रूपामध्ये –

महिमेचे – सहा स्वरूपांमध्ये सांगितलेल्या

प्रवृत्तींची – पंचमुखी कार्यक्रमाच्या आधारावर ओळख

मूल्यांकन आणि सत्यापन

# मानवीय शिक्षा नीतीचे प्रारूप

**1. आधार** -

1-1 हे प्रारूप मध्यस्थ दर्शनावर (सहअस्तित्ववाद) आधारित आहे. हे दर्शन चार भागांमध्ये आहे–

१. मानव – व्यवहार – दर्शन

२. मानव – कर्म – दर्शन

३. मानव – अभ्यास – दर्शन

४. मानव – अनुभव – दर्शन

**2. मानवीय शिक्षा प्रवर्तन कारण-**

2-1 वर्तमानामध्ये मानवांमध्ये आढळणाऱ्या सामाजिक(धार्मिक), आर्थिक आणि राजनैतिक विषमता हेच समरोन्मुखतेचे कारण आहे.

**3. प्रस्तावना** -

जीव चेतनेतून मानव चेतनेमध्ये परिवर्तन

3-1 मानवीयतेच्या सीमेमध्ये धार्मिक (सामाजिक), आर्थिक,राज्यनैतिक समन्वयता राहील कारण प्रत्येक मानव प्राप्त अर्थाचा सदुपयोग आणि सुरक्षेची कामना करतो. अर्थाची सदुपयोगात्मक नीती म्हणजेच धर्म नीती, सुरक्षात्मक नीती हीच राज्यनीती आहे. अर्थाच्या सदुपयोगाशिवाय सुरक्षा आणि सुरक्षेशिवाय सदुपयोग सिद्ध नाही; ह्या सत्यतेमुळे मानव धार्मिक, आर्थिक, राज्यनैतिक पद्धती व प्रणालीने संपन्न होण्यासाठी बाध्य आहे.

## 4. उद्देश -

4-1 मानवीय चेतनावादी शैलीला स्थापित करणे.

4-2 मानवीयतेच्या अक्षुण्णतेसाठी मानवीय संस्कृती, सभ्यता तसेच त्याची स्थापना आणि संरक्षणासाठी विधी व व्यवस्थेला अध्ययनपूर्वक प्रमाणित करवून घ्यायचे आहे ; ह्यामुळे मानवाचे चार आयाम (व्यवसाय, व्यवहार, विचार आणि अनुभूती ) तसेच पाच स्थिती (व्यक्ती, परिवार, समाज, राष्ट्र, अंतर्राष्ट्र) ह्यांच्यामध्ये एकसूत्रता, तारतम्यता आणि अनन्यता प्रत्यक्ष होऊ शकेल. परिणामस्वरूप समाधानात्मक भौतिकवाद, व्यवहारात्मक जनवाद आणि अनुभवात्मक अध्यात्मवाद मानवी जीवनामध्ये चरितार्थ आणि सर्वसुलभ होऊ शकतील. हेच प्रत्येक मानवाचे प्रत्येक स्थितीमध्ये बौद्धिक समाधान आणि (हीच) भौतिक समृद्धी आहे आणि त्याबरोबरच हे मानवाचे अभीष्टसुद्धा आहे.

4-3 व्यक्तित्व आणि प्रतिभेच्या संतुलित उदयाला प्राप्त करणे.

4-4 सगळया प्रकारच्या वर्ग भावना मानवीय चेतनेमध्ये विलय होणे– राहणे.

4-5 सहअस्तित्व आणि समाधानपूर्ण सामाजिक चेतनेला सर्वसुलभ करणे.

4-6 प्रत्येक व्यक्ती जन्मापासूनच न्यायाची याचक आहे आणि योग्य कार्य – व्यवहार करू इच्छिते ; तिच्यामध्ये न्याय प्रदान करण्याची क्षमता तसेच योग्य कार्य – व्यवहार करण्याची योग्यता प्रदान करणे. त्याचबरोबर परम सत्यरूपी सह-अस्तित्व बोध सुलभ करणे.

**4-7** प्रत्येक मानवाच्या जीवनामध्ये अनिवार्यता आणि आवश्यकतेच्या रूपामध्ये आढळणारे बौद्धिक समाधान आणि भौतिक समृद्धी ह्यामधील समन्वयतेला स्थापित करणे.

4-8 शिक्षा प्रणाली, पद्धती आणि व्यवस्थेच्या एकसूत्रतेला मानवीयतेच्या सीमेमध्ये स्थापित करणे.

4-9 प्रकृतिमध्ये विकास क्रम, विकास, जागृती क्रम, जागृती आणि इतिहासाच्या अनुषंगाने मानव, मानव जीवन लक्ष्य, जीवनामध्ये समाधान तसेच जीवनाच्या कार्यक्रमाला स्पष्ट तसेच अध्ययनसुलभ करणे.

4-10 विश्वविद्यालय, महाविद्यालय, विद्यालय, शाळा आणि शिक्षा मंदिरांची गुणात्मक एकता आणि एकसूत्रतेला स्थापित करणे.

4-11 उन्नत मनोविज्ञानाच्या, मानव संचेतनावादी मनो–विज्ञानाच्या संदर्भामध्ये निरंतर शोध व्यवस्थेला प्रस्थापित करणे.

4-12 प्रत्येक विद्यार्थी आणि व्यक्तिला अखंड समाजामध्ये भागीदाराच्या रूपात प्रतिष्ठित करणे.

4-13 शिक्षक , शिक्षार्थी आणि अभिभावक ह्यांच्या तारतम्यतेला व्यवहार शिक्षेच्या आधारावर स्थापित करणे.

4-14 विगत, वर्तमान आणि आगामी पिढीच्या परंपरेच्या प्रत्येक स्तरामध्ये तारतम्यता, एकसूत्रता, सौजन्यता, सहकारिता, दायित्व आणि कर्तव्यपालन योग्य क्षमता निर्माण करणे.

4-15 मानवीय संस्कृती, सभ्यता, विधी आणि व्यवस्थेसंबंधी शिक्षेला सर्वसुलभ बनवणे.

4-16 प्रत्येक मानवामध्ये आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादन आणि कमी उपभोग करण्यायोग्य क्षमतेला प्रस्थापित करणे.

4-17 व्यक्तित्व आणि प्रतिभासंपन्न स्थानिक व्यक्तिंच्या संपर्कामध्ये शिक्षार्थी आणि शिक्षकांना आणण्याची व्यवस्था प्रदान करणे.

## 5. वस्तु विषय प्रणाली

5-1 शिक्षेमधील सगळया विषयांना सगळया स्तरांमधील उद्देश पूर्तीसाठी बोधगम्य आणि सर्वसुलभ बनवण्यासाठी,
सार्वभौम नीतित्रयामध्ये (धार्मिक, आर्थिक, राज्यनैतिक) दृढता आणि निष्ठा स्थापित करण्यासाठी तसेच वर्तमानामध्ये शिकवल्या जाणाऱ्या प्रत्येक विषयाला समग्रतेशी संबद्ध राहण्यासाठी–

क– विज्ञानाबरोबर चैतन्य पक्षाचे

ख– मनोविज्ञानाबरोबर संस्कार पक्षाचे

ग – दर्शनशास्त्राबरोबर क्रिया पक्षाचे

घ– अर्थशास्त्राबरोबर प्राकृतिक आणि वैकृतिक (मानवकृत) ऐश्वर्याच्या सदुपयोगात्मक आणि सुरक्षात्मक नीती पक्षाचे

च– राज्यनीतीशास्त्राबरोबर मानवीयतेच्या संरक्षणात्मक तसेच संवर्धनात्मक नीतीपक्षाचे

छ– समाजशास्त्राबरोबर मानवीय संस्कृती व सभ्यता पक्षाचे

ज– भूगोल आणि इतिहासाबरोबर मानव तसेच मानवीयतेचे

झ – साहित्याबरोबर तात्विक पक्षाचे

अध्ययन अनिवार्य आहे.

## 6. तकनीकी ( तांत्रिक ) शिक्षण -

6-1 उत्पादन आणि निर्माण शक्तिच्या विपुलतेसाठी निपुणता आणि कुशलतेचे पूर्णपणे प्रशिक्षण करवण्यासाठी समृद्ध प्रणाली, व्यवस्था आणि अध्ययन राहील ज्यामुळे मानवाच्या सामान्य आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षेशी संबंधित वस्तुंची निर्मिती सुगमतेने होऊ शकेल.

6-2 तकनीकी (तांत्रिक) शिक्षणाबरोबर सामाजिकता तसेच व्यक्तिमध्ये निष्ठेला व्यवहारिक रूप देण्याची व्यवस्था आणि प्रणाली अध्ययन रूपात राहील.

6-3 शिक्षेच्या ह्या स्तरामध्ये अतिमानवीयतापूर्ण जीवनाच्या शक्यतेला स्पष्ट करण्यायोग्य अध्ययन राहील.

6-4 प्रत्येक विद्यार्थ्याला उत्पादन क्षमतेमध्ये निष्णात बनवण्यासाठी अध्ययन असेल, ज्यामुळे अधिक उत्पादन आणि कमी उपभोग संपन्न होऊ शकेल.

6-5 तकनीकी (तांत्रिक) अध्ययनाबरोबर व्यवहारिक अध्ययन अनिवार्य रूपामध्ये राहील ज्यामुळे प्रत्येक व्यक्ती उद्यमशील आणि सामाजिक सिद्ध होऊ शकेल.

6-6 कृषि उद्योग आणि स्वास्थ्याशी संबंधित पूर्ण तकनीकी (तांत्रिक) शिक्षण औपचारिक रूपात न राहता प्रत्यक्ष रूपात राहील.

## 7. शिष्ट मंडळ -

7-1 प्रत्येक राष्ट्रीय स्तरामध्ये एक शिष्ट मंडळ राहील ज्यामध्ये शोध आणि अनुसंधानकर्त्यांचा समावेश राहील. हेच राष्ट्रीय आणि अंतर्राष्ट्रीय (आंतर राष्ट्रीय) शिष्टमंडळ

शिक्षा नीतीमध्ये प्रणाली तसेच पद्धतीच्या पूर्णतेप्रती आणि दृढतेप्रती ह्यांच्या दायित्व वहनाचा सजगतेने निर्वाह करेल.

7-2 हेच मंडळ वैध सीमेमध्ये शिक्षण संस्थांच्या दायित्वांचे निर्धारण, दिशा – निर्देश, पद्धती तसेच प्रणाली संबंधी आदेश देण्याचे अधिकारी असेल.

7-3 ह्यांच्याद्वारे दिल्या गेलेल्या प्रस्तावना, शासन– सदन सभेद्वारे संमती मिळवण्यासाठी बाध्य राहतील.

7-4 शिक्षेसंबंधी गुणात्मक परिवर्तनासाठी उपयुक्त प्रस्तावनाधिकार ह्याच मंडळामध्ये समाहित राहील.

7-5 व्यक्तिगत रूपामध्ये प्राप्त प्रस्तावनांचे अवगाहन करण्याची (आत्मसात करण्याची) व्यवस्था राहील. त्याचबरोबर त्यांच्यासाठी सन्मान व पुरस्कार प्रदान करण्याची व्यवस्था सुद्धा राहील ज्यामुळे व्यक्तिगत प्रतिभेविषयी विश्वास होऊ शकेल.

7-6 प्रत्येक राष्ट्राचे शिष्टमंडळ मानवीयतेच्या सीमेमध्येच शिक्षा नीती, प्रणाली आणि पद्धतीचा प्रस्ताव करेल ज्यामुळे मंडळांमध्ये परस्पर विरोध होऊ शकणार नाही.

7-7 शिक्षेच्या सार्वभौमिकतेच्या अक्षुण्णतेसाठी (निरंतरतेसाठी) अंतर्राष्ट्रीय (आंतर राष्ट्रीय) शिष्टमंडळ राहील ज्यामुळे अखंड समाजाची निरंतरता कायम राहील.

8. **व्यवस्था-**

8-1 प्रत्येक शिक्षणसंस्था आपल्या क्षेत्रामध्ये प्रौढ व्यक्तिंना साक्षर बनवण्यासाठी, समजदार बनवण्यासाठी तसेच प्रत्येक बालक बालिकेला शिक्षा प्रदान करण्यासाठी उत्तरदायी असेल.

8-2 शिष्टमंडळाद्वारे प्रत्येक पदामध्ये दायित्व ठरेल.

8-3 संस्थांचे दायित्व व निर्वाह पद्धती – प्रत्येक शिक्षण संस्था आपल्या कार्यक्षेत्रामध्ये आढळणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राज्यनैतिक आणि व्यवहारिक व्यवस्थेच्या परस्परतेमध्ये समस्यांचे समाधान प्रस्तुत करण्याची व्यवस्था करेल. त्याचबरोबर वैध प्रणाली, पद्धती, नीती व व्यवस्थेचे पालन करण्यासाठी उत्तरदायी राहील.

8-4 स्थानिक स्थितीच्या चित्रणाधिकाराचे दायित्व स्थानिक संस्थेचे असेल.

8-5 पूर्ण चित्रणस्तराच्या अधिकाऱ्यांद्वारे प्रत्येक सर्वेक्षण संपन्न केले जाईल; त्याचे परीक्षण करण्याचा अधिकार त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्याला असेल. ज्यामुळेच; -

**''भूमी स्वर्ग होईल, मानवच देव होतील.**
**धर्म सफल होईल, नित्य मंगलच होईल.''**